सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २२४ | गुरुवार, दि. ०७ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन





**श्री. निलेश पाटील**
उद्योजक : स्वादिष्ट नमकीन, अमळनेर



**श्री. रवींद्र धनगर**
पोलीस, अमळनेर



**सौ. उषाताई देवरे**
शिक्षिका, अमळनेर



**श्री. भैय्या पाटील**
शिक्षक



**श्री. भरत सूर्यवंशी**
अमळनेर



**श्री. अजय दिवरे**
अमळनेर



**प्रा.डॉ. कृष्णा पोतदार**
धुळे

## दिनविशेष

७ मे

- मुंबईत इलेक्ट्रिक ट्राम सुरू झाली.
- लता मंगेशकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान.
- अर्जुन विष्णुवर्धन, तिरुवनंतपुरमचा नऊ वर्षांचा बुद्धिबळपटू, कोची येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत भारताचा सर्वात तरुण मास्टर बनला.

### गांधली जलशुद्धीकरण केंद्रातून अवैध नळ कनेक्शन

# तब्बल महिना उलटल्यानंतरही दोषींवर कारवाईला विलंब; आंदोलनाचा इशारा

## नगरपरिषदेकडून खुलाशात जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील नगरपरिषद हद्दीतील गांधली जलशुद्धीकरण केंद्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध नळ कनेक्शन दिले गेले असल्याचा गंभीर प्रकार नुकताच उघडकीस आणला. मात्र यासंदर्भात नगरपालिका प्रशासनाकडून संबंधितांवर गेल्या ३० दिवसांपासून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे येत्या दहा दिवसांत या प्रकरणी संबंधितांवर ठोस कारवाई न झाल्यास आपण स्थानिक नागरिकांच्या मदतीने आंदोलन छेडू, असा इशारा येथील राजारामनगरातील रहिवासी परेश रवींद्र उदेवाल यांनी दिला आहे.

याबाबत श्री. उदेवाल यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे व लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांना निवेदन दिले आहे. तसेच लेखी तक्रारही दाखल केलेली आहे. मात्र, नगरपालिका प्रशासनाने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना केवळ नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच खुलासा करताना जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे दिसत आहे.




*अमळनेर : मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्याकडे आंदोलन छेडण्यासंदर्भातील इशाऱ्याचे निवेदन देताना परेश रवींद्र उदेवाल.*

या प्रकरणात नगरपरिषद प्रशासनाने अद्याप कोणतीही तक्रार पोलिसांत दाखल केलेली नाही, तसेच निलंबन किंवा सखोल चौकशीची प्रक्रियाही सुरू केलेली नाही. जर सभापतींच्या सांगण्यावरून हे कनेक्शन दिले गेले असतील तर त्यांच्यावरही कारवाई व्हावी. मात्र, काहीही हालचाल नसल्यामुळे नगरपरिषद प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून, संबंधित प्रकरण जाणीवपूर्वक दडपले जात असल्याची शक्यताही व्यक्त होत नाही. श्री. उदेवाल यांनी नगरपरिषदेस दिलेल्या निवेदनात गांधली जलशुद्धीकरण केंद्रातील सर्व अवैध नळ कनेक्शन तत्काळ बंद करण्याची मागणी केली आहे. तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करून त्यांना निलंबित करावे. तसेच स्वतंत्र चौकशी समितीमार्फत निष्पक्ष चौकशी करावी आणि नगरपरिषदेने झालेल्या आर्थिक नुकसानीची वसुली संबंधितांकडून करावी, अशा मागण्याही करण्यात आहेत. तसेच ज्या पदाधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून हे कनेक्शन देण्यात आले त्यांच्यावरही कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, या सर्व मागण्यांवर येत्या दहा दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास अमळनेर नगरपरिषदेसमोर धरणे आंदोलन तसेच उपोषण व मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा श्री. उदेवाल यांनी दिला आहे. तसेच या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. ▲



# पीककर्ज वाटपात पुन्हा गंभीर अडथळे

### 'एटीएम'द्वारा पैसे मिळत नसल्याने शेतकरी वाऱ्यावर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जिल्ह्यातील पीककर्ज वाटप प्रक्रियेत पुन्हा एकदा गंभीर अडथळे निर्माण झाले आहेत. 'एटीएम'द्वारा पैसे न मिळाल्याने शेतकरी अक्षरशः वाऱ्यावर आहेत. मार्च महिन्यात मोठ्या कष्टाने रोखीने पीककर्जाची परतफेड केलेल्या लाखो शेतकऱ्यांना आता नव्या कर्जासाठी 'एटीएम'करिता चकरा माराव्या लागत आहेत. मात्र, मागील आठवड्यापासून 'एटीएम'द्वारा रोख रक्कम उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांना दिवसभर फिरूनही रिकाम्या हाताने परतावे लागत आहे.

शेतकऱ्यांची मागणी असताना देखील जिल्हा बँकेकडून कर्ज वाटप केवळ आयसीसी बँकेच्या 'एटीएम'द्वारेच करण्यात येत असल्याचा आरोप होत आहे. मायक्रो एटीएम किंवा थेट शाखेमार्फत रोख रक्कम देण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात यावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. 'एटीएम'द्वारा पैसे काढण्यासाठी अनेकांना त्यातील जाणकार व्यक्ती सोबत घ्यावा लागत असून, त्यासाठी अतिरिक्त खर्चही सहन करावा लागत आहे.

दरवर्षी याच समस्येला शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत असतानाही प्रशासन आणि बँक व्यवस्थापनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत लीड बँक व्यवस्थापक सुनील देव्हारा यांच्याशी संपर्क साधला असता जिल्ह्यात कॅश उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, काही शेतकऱ्यांच्या कुटुंबात विवाहासारखी तातडीची कामे असल्याने त्यांना त्वरित पैशांची गरज आहे. अशा परिस्थितीत बँकेने किमान अर्धी रक्कम रोखीने देण्याचे दिलेले आश्वासन तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी होत आहे. या प्रश्नावर तत्काळ तोडगा न काढल्यास किसान काँग्रेसच्या माध्यमातून बँकेवर मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा शेतकरी नेते प्रा. सुभाष पाटील यांनी दिला आहे ▲

### यात्रेतील चिखल व घाणीचे साम्राज्य...!



### अमळनेर यात्रोत्सव

# ढिसाळ नियोजनाचा बसला फटका; व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ

### पाण्याच्या सुविधेचे योग्य नियोजन करण्यातही प्रशासन अपयशी..!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




> *यात्रेतील व्यावसायिकांना जागा उपलब्ध करून दिली आहे. तरीदेखील काहींनी दुकाने दुसऱ्या ठिकाणी थाटली असतील, तर ज्या पालिकेतील कर्मचाऱ्यांना लगेच पाठवून ज्या काही समस्या असतील त्या सोडविण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जात आहे.*
> **– गणेश शिंदे**
> **मुख्याधिकारी, नगरपरिषद, अमळनेर.**

अमळनेर : येथील शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या सदगुरू संतश्री सखाराम महाराज वाडी संस्थानाच्या यात्रोत्सवाप्रसंगी नगरपरिषदेच्या ढिसाळ आणि निष्काळजीपर नियोजनामुळे शहरातील व्यावसायिकांवर अक्षरशः उपासमारीची वेळ येण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. यात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात मोठ्या प्रमाणावर गर्दी असतानाही मूलभूत सुविधांचा पूर्णपणे अभाव दिसून येत आहे. पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करण्यात प्रशासन अपयशी ठरल्याने नागरिकांसह व्यापारी वर्गही प्रचंड त्रस्त आहे.

दरम्यान, काही भागांत गटारीचे सांडपाणी थेट दुकानांमध्ये शिरण्याच्या घटना समोर आलेल्या आहेत. अक्षरशः घाण पाण्यात उभे राहून दुकानदारांना आपला व्यवसाय चालवावा लागत आहे. परिणामी ग्राहकांनी पाठ फिरवली असून अनेक दुकानांचा व्यवसाय पूर्णपणे ठप्प झाला आहे. यात्रेच्या निमित्ताने शहरात लाखो रुपयांची उलाढाल अपेक्षित असताना अशा परिस्थितीमुळे व्यवसायिकांचे मोठे नुकसान होत आहे. ना पिण्याचे पाणी, ना स्वच्छता मग व्यवसाय कसा करायचा? असा संतप्त सवाल व्यापारी वर्गातून उपस्थित केला जात आहे. नगर परिषदेच्या नियोजनशून्यतेमुळे आर्थिक फटका बसत असल्याची भावना स्पष्टपणे व्यक्त होत आहे. एकीकडे पाण्याच्या टंचाईने नागरिक हैराण असताना, दुसरीकडे गटारीचे पाणी दुकानांत घुसणे ही बाब प्रशासनाच्या अपयशाची साक्ष देत आहे. अमळनेर नगरपालिकेच्या कारभारावर आता मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिक आणि व्यवसायिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. परिस्थिती सुधारण्यासाठी तात्काळ उपाययोजना केल्या नाहीत, तर आंदोलनाची ठिणगी कधीही पेटू शकते. ▲



## संपादकीय



# सामाजिक विकृती रोखण्याचे आव्हान


पुणे जिल्ह्यातील नसरापूर आणि म्हाळुंगे येथे चिमुकल्यांवर अत्याचार करून त्यांच्या हत्या करण्याच्या घटना कोणत्याही संवेदनशील मनाला सुन्न करणाऱ्या आहेत. उन्हाळ्याच्या सुटीनिमित्त नसरापूर येथे आजोळी गेलेल्या साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर साठीतील वृद्धाने गोठ्यात नेऊन प्रथम अत्याचार केले आणि नंतर दगडाने ठेचून तिची हत्या केली. तसेच म्हाळुंगे येथे मूळच्या बिहारमधील एका विधीसंघर्षग्रस्त मुलाने लहान मुलावर अत्याचार करून त्याला मारून टाकले. सारे राज्य महाराष्ट्र दिनानिमित्त आपल्या तेजस्वी इतिहासाचे गौरवगान करीत असताना समोर आलेले हे प्रकार समाजाची मान शरमेने खाली झुकविणारे आहेत. या घटनांनंतर संतापाची लाट उसळणे आणि गुन्हेगारांना कठोरातील कठोर शिक्षा करण्याची मागणी होणे स्वाभाविक आहे. संतप्त नागरिकांनी महामार्ग रोखून धरण्यापासून कडकडीत बंद पाळण्यापर्यंतचा प्रतिसादही साहजिक आहे. या घटनांनंतर पोलिसांनी तत्परतेने गुन्हेगारांना केलेल्या अटकेनंतर तसेच खटले 'फास्ट ट्रॅक' कोर्टात चालवून आरोपींना शिक्षा करण्याच्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतरही नागरिकांचा संताप न शमणे, हा अशा घटनांवर आळा घालण्यात सरकारला आलेले अपयशच म्हणावे लागेल. कारण दुर्दैवाने अशा घटना नियमित अंतराने घडत आहेत. प्रत्येक घटनांनंतर तीच ती आश्वासने दिली जातात; परंतु अशा घटनांमागील विकृती काही थांबताना दिसत नाही. अशी प्रत्येक घटना रोखणे पोलिसांना अवघड आहे. परंतु यापूर्वी घडलेल्या गुन्ह्यांमधील आरोपींना वेळेवर कठोर शिक्षा आणि अशा घटनांना आळा घालण्यासाठी कडक प्रतिबंध घालण्याची जबाबदारी राज्याच्या गृह खात्याला टाळता येणार नाही.

नसरापूरमधील घटनेत नराधमाने मुलीला फसवून गोठ्यात नेले, अत्याचार करून निर्घृण खून केला. या आरोपीने पूर्वीही असे दोन गुन्हे केले होते; तरीही त्याला जामीन मिळाला. त्याला मोकळे का सोडले, हा प्रश्न उपस्थित होतो. दोन वर्षांपूर्वी बदलापूरमध्ये शाळेत लहान मुलांवर अत्याचाराचा प्रकार उघडकीस आला होता. त्या गुन्ह्यातील आरोपीचे 'एन्काउंटर' करण्यात आले आणि पोलिस–सरकारने वाहवा मिळविली. कठोर कायदे करून किंवा चकमकीद्वारे गुन्हेगाराला मारूनही नियंत्रण राहिलेले नाही. आरोपींचे 'एन्काउंटर' करून प्रश्न सुटत नाहीत, हे वास्तवही समोर आले असून, चकमकीचे श्रेय घेणारे अपश्रेय घेणार का, असाही प्रश्न आहे. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात लहान मुलांवरील अत्याचार आणि हत्यांचे प्रकार वाढत आहेत. लैंगिक अत्याचारांपासून लहान मुलांच्या संरक्षणाचा कायदा (पोक्सो) लागू होऊन एक तप उलटले आहे. विशेष न्यायालये, जलदगतीने खटले चालविणे, बालकांशी मैत्रीपूर्ण व्यवहार आणि गोपनीयतेचे संरक्षण यांवर त्या कायद्यात भर आहे. मात्र, यापैकी बहुतांश तत्त्वांचे पालन होत असल्याचे दिसत नाही.

अशा घटनांनंतर आपल्या घरातील मूल सुरक्षित आहे का, अशी चिंता वाटणे साहजिक आहे. पोलिस कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या आणि साधनांचा अभाव पाहता खेडोपाडी होणारे असे गुन्हे रोखणे अवघड असल्याचा युक्तिवाद करण्यात येतो. मात्र, आजवर घडलेल्या घटनांमध्ये पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी पुरेशी पावले उचलण्यात आलेली नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. शहरांत व खेड्यांमध्ये शाळा व परिसरात प्रतिबंधात्मक उपाय योजले जात नाहीत. मध्यंतरी पुण्यात बोपदेव घाटात बलात्काराची घटना उघडकीस आल्यानंतर तेथे गस्त सुरू झाली; स्वारगेट अत्याचारानंतर 'सीसीटीव्ही' बसविण्यात आले. घटना घडून गेल्यानंतरच्या या उपाययोजना यंत्रणेच्या गाफिलपणाचीच साक्ष देतात. अर्थात केवळ पोलिसांवर ठपका ठेवून चालणार नाही. आपल्या वस्तीत–सोसायट्यांमध्ये मुलांवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष काळजी घ्यावी लागेल. अजाण बालकांनाही ओळखीच्या किंवा अनोळखी व्यक्तींच्या संशयित वागण्याबाबत सावधगिरीचे शिक्षण–प्रशिक्षण द्यावे लागेल. समाजमाध्यमांमधून पसरणाऱ्या विकृतीला कसे रोखणार, हा तर महत्त्वाचा प्रश्न आहे. पुरेशी सावधानता, दक्ष यंत्रणा, गुन्ह्यांना प्रतिबंध, जलद न्याय, कठोर शिक्षा आणि सामाजिक पातळीवरील सजगता हेच यावरील उपाय आहेत.

# विचारांचा अखंड दीपस्तंभ

**जन्मदिन विशेष**



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय साहित्य, कला आणि संस्कृतीच्या विश्वात ज्यांचे नाव अजरामर आहे, असे थोर कवी, तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि राष्ट्रचिंतक म्हणजे गुरुदेव रवींद्रनाथ टागोर. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांचे कार्य, विचार आणि योगदान यांचा आढावा घेणे म्हणजे भारतीय सांस्कृतिक वारशाला अभिवादन करण्यासारखे आहे.

रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकाता येथे एका सुसंस्कृत आणि प्रगतिशील कुटुंबात झाला. लहानपणापासूनच त्यांना साहित्य, संगीत आणि कलेची आवड होती. त्यांच्या प्रतिभेची झलक त्यांच्या बालवयातच दिसून आली होती. त्यांनी औपचारिक शिक्षणापेक्षा स्व–अभ्यासावर भर दिला आणि याच स्वातंत्र्यपूर्ण शिक्षणामुळे त्यांच्या विचारांना व्यापक दिशा मिळाली.

टागोर हे केवळ कवी नव्हते, तर ते एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी कविता, कादंबऱ्या, नाटके, लघुकथा, निबंध आणि गीते अशा विविध साहित्यप्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांचा 'गीतांजली' हा काव्यसंग्रह जगप्रसिद्ध ठरला आणि १९१३ मध्ये त्यांना साहित्यातील नोबेल पारितोषिक बहाल करण्यात आले. हे पारितोषिक मिळविणारे ते पहिले आशियाई ठरले, ही भारतीयांसाठी अभिमानाची बाब आहे.

टागोर यांच्या साहित्यामध्ये मानवी मूल्ये, निसर्गप्रेम, आध्यात्मिकता आणि सामाजिक जाण यांचा सुंदर संगम दिसतो. त्यांनी आपल्या लेखनातून स्वातंत्र्य, मानवता आणि विश्वबंधुत्व यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांची कविता आणि गीते आजही लोकांच्या मनाला भिडतात. "जन गण मन" हे भारताचे राष्ट्रगीत आणि 'आमार शोनार बांग्ला' हे बांगलादेशचे राष्ट्रगीत ही त्यांच्या लेखणीचीच देणगी आहे.

शिक्षणक्षेत्रातही टागोर यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी शांतिनिकेतन येथे 'विश्वभारती' विद्यापीठाची स्थापना केली. या संस्थेमार्फत त्यांनी पारंपरिक शिक्षणपद्धतीला पर्याय म्हणून निसर्गाशी सुसंगत आणि सर्जनशील शिक्षणाची संकल्पना मांडली. त्यांच्या मते, शिक्षण हे केवळ पुस्तकापुरते मर्यादित नसून ते जीवनाशी जोडलेले असावे.

टागोर हे एक विचारवंत राष्ट्रभक्तही होते. त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला नाही, तरी त्यांच्या लेखनातून त्यांनी ब्रिटिश सत्तेचा निषेध केला आणि भारतीयांच्या आत्मसन्मानाला जागृत केले. जालियनवाला बाग हत्याकांडाच्या निषेधार्थ त्यांनी आपला 'सर' हा किताब परत केला, ही त्यांच्या राष्ट्रप्रेमाची साक्ष आहे.

आजच्या युगात टागोर यांच्या विचारांची अधिकच गरज आहे. जागतिकीकरणाच्या काळात मानवतेचे मूल्य, सांस्कृतिक एकात्मता आणि निसर्गाशी सुसंवाद राखण्याचा संदेश त्यांनी दिला होता. त्यांच्या विचारांचा अंगीकार केल्यास समाज अधिक संवेदनशील आणि सुसंस्कृत होऊ शकतो. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचा जन्मदिन हा केवळ एक स्मरणदिन नसून त्यांच्या विचारांचा पुनर्विचार करण्याची आणि त्यांना आपल्या जीवनात उतरवण्याची संधी आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

### अमळनेर शेतकी संघ निवडणूक

# १५ जागांसाठी १६२ उमेदवारी अर्ज

## उन्हाळ्यामुळे निवडणूक पुढे ढकलण्याची जिल्हा उपनिबंधकांची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील शेतकी संघाच्या निवडणुकीत अर्ज भरण्याच्या मंगळवार, दि. ५ मे रोजीच्या शेवटच्या दिवसापर्यंत १५ जागांसाठी एकूण १६२ अर्ज दाखल करण्यात आले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून शेतकी संघावर प्राशसक राज असल्याने निवडणुकीच्या माध्यमातून अनेकांनी आपली उमेदवारी दाखल केली आहे.

यामध्ये माजी नगराध्यक्ष, माजी सभापती, माजी अध्यक्ष यांच्यासह गटनेते, बाजार समिती संचालक अशा अनेकांनी उमेदवारी दाखल केली आहे. दरम्यान, मे महिन्यात निवडणूक होत असल्याने ती पुढे ढकलण्यात यावी, अशी मागणी करण्यात आल्याने जिल्हा उपनिबंधक बळसाणे यांनी याबाबत राज्य निवडणूक प्राधिकरणाकडे अहवाल कळविला आहे.

### शेतकी संघाचा निवडणूक कार्यक्रम असा

- २७ एप्रिल ते ४ मे पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करणे.
- ५ मे रोजी छाननी
- ६ मे ते २० मे माघार
- २१ मे रोजी निवडणूक चिन्हांचे वाटप व अंतिम उमेदवार यादी जाहीर करणे.
- ३० मे रोजी मतदान
- ३१ मे रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर करणे.

सर्वच मतदारसंघांत बाजार समिती माजी सभापती प्रफुल्ल पाटील, माजी नगराध्यक्ष विनोद पाटील, माजी संचालक, सरपंच सचिन पाटील, शेतकरी नेते प्रा. सुभाष पाटील, विक्रांत पाटील, शेतकी संघाचे माजी अध्यक्ष संजय पाटील, श्याम पवार, बी. के. सूर्यवंशी, साने गुरुजी संस्थेचे सचिव संदीप घोरपडे, सुषमा देसले, गिरीश पाटील, गायत्री पाटील, दीपक पाटील, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष भागवत पाटील, शिवाजीराव पाटील, सुरेश पाटील, पालिकेतील गटनेते महेश देशमुख, खानदेश शिक्षण मंडळाचे जितेंद्र देशमुख, महेंद्र बोरसे, पोलीसपाटील गणेश भामरे, प्रवीण गोसावी आदी तालुक्यातील दिग्गज उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.

शेतकरी संघाच्या १५ जागांसाठी ही निवडणूक होत असून, यात व्यक्तिशः मतदारसंघ (५), सोसायटी मतदार संघ (५), महिला राखीव (२), इतर मागास वर्ग (१), एस.सी./एस. टी. (१), एन. टी. (१) अशा जागा आहेत. सर्वच मतदारसंघांत तालुक्यातील दिग्गज उमेदवारांनी अर्ज दाखल केले असल्याने उमेदवारी दाखल अर्जांची संख्या १६२ वर जाऊन पोहोचली आहे. आता माघारीकडे लक्ष लागले असून, त्यानंतरच खऱ्या अर्थाने चित्र स्पष्ट होणार आहे.

# बुलेटच्या कर्कश आवाजावरून हळदीच्या कार्यक्रमात राडा

### दोन गटांमध्ये तुफान मारामारी; महिलेचाही विनयभंग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : हळदीच्या कार्यक्रमात बुलेटच्या सायलेन्सरचा मोठ्याने आवाज करण्यात आला. या कारणातून दोन गटांत हाणामारी होऊन तिघे जखमी, तर महिलेचा विनयभंगही झाल्याची घटना तालुक्यातील तांदळी येथे रविवार, दि. ३ मे रोजी घडली. यासंदर्भात तांदळी येथील एका तीसवर्षीय महिलेच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

फिर्यादीतील माहिती अशी, की रविवार, दि. 3 मे रोजी मुलगा मयूर हा भूषण रमेश शिरसाठ याच्या हळदीच्या कार्यक्रमासाठी गेला होता. सोमवार, दि. ४ मे रोजी मध्यरात्री दीडच्या सुमारास तो बुलेटवरून घरी परतत होता. याचवेळी त्याला राजू गुलाब शिरसाठ, संदीप हरचंद शिरसाठ, सोनत्या बापू शिरसाठ, सौरभ वसंत शिरसाठ यांनी 'तू बुलेटच्या सायलेन्सरचा मोठ्याने आवाज का करतो' अशी विचारणा करीत चापटा–बुक्क्यांनी मारहाण केली. याबाबत संबंधित महिलेल्या पतीने जाब विचारला असता संदीप शिरसाठ यांनी अंगणातील वीट उचलून पतीच्या डोक्यात मारली.

**महिलेचाही केला विनयभंग**

पतीच्या डोक्यातून रक्त निघू लागले तेव्हाही संदीप शिरसाठ याने दरवाजाला लाथ मारून महिलेची साडी ओढून तिला अंगावर ओढले. त्यात तिची सोनसाखळी तुटली. तसेच लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्यही केले. त्यानंतर चारचाकीला दगड मारून काच फोडले. तसेच मयूरला गंभीर मारहाण केली. यावरून मारवाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, हवालदार संजय सूर्यवंशी तपास करीत आहेत.

# खाटू श्याम, अजमेरसाठी आता रेल्वे नियमित

## जळगाव जिल्ह्यातील प्रवाशांना मोठा दिलासा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जिल्ह्यातून खाटू श्याम तसेच अजमेर दर्गाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची संख्या सातत्याने वाढत आहे. त्यात प्रवाशांचा मोठा प्रतिसाद लक्षात घेऊन ही विशेष रेल्वेगाडी आता नियमित धावणार आहे. त्यामुळे जळगाव जिल्ह्यातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळू शकणार आहे.

खानदेशातील भाविकांसाठी खाटू श्याम आणि अजमेर दर्गा दर्शनाचा प्रवास आता अधिक सुलभ झाला आहे. पूर्वी दोन्ही ठिकाणी जाण्यासाठी बस किंवा अनेक रेल्वेगाड्या बदलण्याची गरज भासत होती. सध्या कार्यरत असलेल्या ०७७१७/०७७१८ काकीनाडा टाऊन ते हिसार साप्ताहिक विशेष गाड्यांचे नियमित सेवेत रूपांतर झाल्यानंतर १७२९५ काकीनाडा टाऊन ते हिसार साप्ताहिक १२ मे पासून काकीनाडा टाऊन येथून तसेच गाडी क्रमांक १७२९६ हिसार ते काकीनाडा टाऊन साप्ताहिक एक्स्प्रेस १५ मे २०२६ पासून हिसार येथून धावणार आहे. पैकी १७२९५ एक्स्प्रेस दर मंगळवारी काकीनाडा टाऊन येथून ०५.४० वाजता सुटेल आणि तिसऱ्या दिवशी हिसार येथे १०.२० वाजता पोहोचेल. १७२९६ एक्स्प्रेस दर शुक्रवारी हिसार येथून दुपारी ०२.१० वाजता सुटेल आणि तिसऱ्या दिवशी काकीनाडा टाऊन येथे रात्री ०९.३५ वाजता पोहोचेल.

**या स्थानकांवर थांबा**

या गाड्यांना दोन्ही बाजूने सामलकोट, राजमुंद्री, तादेपल्लीगुडम, एलुरू, विजयवाडा, गुटूर, मिरयालगुडा, नालगोंडा, चार्लापल्ली, मेडचल, कामारेड्डी, निजामाबाद, बासर, धर्माबाद, हुजूर साहेब नांदेड, पूर्णा, बसमत, हिंगोली डेक्कन, वाशिम, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, धरणगाव, अमळनेर, नंदुरबार, उधना, वडोदरा, रतलाम, मंदसोर, नीमच, चित्तोरगढ, भिलवारा, बिजेनगर आदी स्थानकांवर थांबा असेल.

# न डोळे, न कान, तरीही टॉपर!

## सारा मोईन हीने अंपगत्वावर मात करीत १२ वीत मिळवले ९८.७५ टक्के गुण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



उत्तर प्रदेशातील लखनौ येथे राहणाऱ्या सारा मोईल हीने आयएससी बारावी बोर्डाच्या परीक्षेत ९८.७५ टक्के गुण मिळवून तिच्या ख्राईस्ट चर्च कॉलेजमधून पहिला नंबर पटकावला आहे.

नुकतेच बारावीचे निकाल लागले. या परीक्षेत अनेक विद्यार्थ्यांनी मोठे यश मिळविले आहे. मात्र, लखनौ येथील १९ वर्षीय सारा मोईन या दिव्यांग विद्यार्थीनीने जे यश मिळविले त्याला तोड नाही. सारा मोईन हीला नीट दिसत नाही आणि ऐकायला देखील येत नाही. एवढेच काय तिला बोलताना देखील त्रास होतो. या अडचणींवर मात करुन सारा हीने आयएससीच्या १२ वीच्या परीक्षेत ९८.७५ टक्के मिळवून लखनौच्या ख्राईस्ट चर्च कॉलेजमधून टॉप केले आहे. २५८ विद्यार्थ्यांमध्ये सर्वांत गुण मिळवून सारा हीने सिद्ध केले, की जर इच्छा असेल तर कोणीही तुमचा मार्ग अडवू शकत नाही.

सारा जेव्हा केवळ चार वर्षांची होती तेव्हा तिला सारकॉयडोसिस नावाची दुर्मिळ आजार झाला. ज्यामुळे हळूहळू तिची दृष्टी अधू झाली. काही वर्षांनी तिची श्रवण शक्ती देखील नष्ट झाली. बोलताना तिला अडचण होत होती. मात्र, या आव्हानावर मात करत तिने हार मानली नाही. तिचे वडील मोइन अहमद यांनी मुलीच्या शिक्षणासाठी नोकरी सोडली.आणि तिला ते शाळेत घेऊन जाऊ लागले. ख्राईस्ट चर्च कॉलेजने देखील सारा हिच्यासाठी विशेष व्यवस्था केली. या शाळेत विशेष गरज असलेल्या मुलांसाठी वेगळे सेक्शन असून तेथे प्रशिक्षित शिक्षक त्यांना शिकवतात.

### अभ्यासासाठी खास उपकरण

सारा हीला अभ्यासासाठी ऑर्बिट रीडर सारख्या ब्रेल उपकरणाचा वापर केला जातो. पुस्तकांना स्कॅन करुन डिजिटल फॉर्मेटमध्ये बदलले गेले. त्यामुळे अंध मुलांना अभ्यास करता येतो. परीक्षेत देखील ब्रेल लिपीत प्रश्न पत्रिका दिली जाते. सारा हीने मिळवलेले यश हे तिचा संघर्ष, कुटुंबाचा त्याग आणि शिक्षकांची मेहनतची परिणाम आहे. तिचे शिक्षक तिला प्रेमाने हेलेन केलर म्हणतात.

### प्रिंसिपल काय म्हणाले ?

सारा हीच्या या अभूतपूर्व यशाबद्दल प्रिन्सिपल यांनी सांगितले की सारा हीच्या यशाचा संस्थेला अभिमान आहे. साराने दाखवून दिले की मर्यादा शरीराला असतात, स्वप्नांना नाही.

# समतेचा आणि भक्तीचा अखंड जागर

**स्मृतिदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


भारतीय संतपरंपरेत अनेक संतांनी समाजाला दिशा दिली, परंतु समाजातील अन्याय, अस्पृश्यता आणि भेदभाव यांविरुद्ध ज्या संतांनी आपल्या भक्तीच्या माध्यमातून आवाज उठवला, त्यामध्ये संत चोखामेळा यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा आणि विचारांचा आढावा घेणे म्हणजे मानवतेच्या मूल्यांना उजाळा देणे होय.

संत चोखामेळा यांचा जन्म इ.स. १४ व्या शतकात महाराष्ट्रातील पंढरपूरजवळील मेहुणराजा येथे महार समाजात झाला. त्या काळात समाजात जातिभेद अत्यंत तीव्र होता आणि खालच्या जातीतील लोकांना मंदिरप्रवेशासह अनेक मूलभूत हक्क नाकारले जात होते. अशा प्रतिकूल परिस्थितीतही चोखामेळा यांनी विठ्ठलभक्तीचा मार्ग स्वीकारला आणि आपल्या आयुष्याला अध्यात्माची दिशा दिली.

चोखामेळा हे वारकरी संप्रदायातील एक महान संत होते. ते संत नामदेवांचे समकालीन होते आणि त्यांच्या सहवासात त्यांनी भक्तीची खरी शिकवण आत्मसात केली. जरी त्यांना विठ्ठलाच्या मंदिरात प्रवेश करण्याची परवानगी नव्हती, तरी त्यांनी मंदिराच्या बाहेर उभे राहून अखंड नामस्मरण केले. त्यांच्या भक्तीची प्रखरता इतकी होती की, समाजाच्या बंधनांनाही ती भेदून गेली. त्यांच्या अभंगांमध्ये सामाजिक विषमता, दुःख, अन्याय आणि समतेचा संदेश स्पष्टपणे दिसून येतो. "आम्ही अपराधी नाही, आम्ही विठ्ठलाचे दास आहोत" असा ठाम संदेश त्यांनी आपल्या रचनांमधून दिला. त्यांच्या अभंगांमध्ये एकीकडे करुणा आहे, तर दुसरीकडे समाजव्यवस्थेवर केलेली तीव्र टीकाही आहे. त्यांनी देव सर्वांचा आहे, कोणत्याही जातीचा नाही, हा विचार लोकांपर्यंत पोहोचविला.

संत चोखामेळा यांच्या जीवनातील एक अत्यंत हृदयस्पर्शी प्रसंग म्हणजे त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांच्या अस्थी 'विठ्ठल, विठ्ठल' असा जप करत असल्याची कथा. हा प्रसंग त्यांच्या भक्तीची पराकाष्ठा दर्शवतो आणि त्यांच्या जीवनाचे सार सांगतो. त्यांच्या कार्यामुळे समाजातील अनेकांना आत्मसन्मानाची जाणीव झाली. त्यांनी केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी केली. त्यांच्या विचारांनी पुढील संतांना प्रेरणा दिली आणि समाजातील समतेच्या लढ्याला बळ मिळाले.

आजच्या काळातही संत चोखामेळा यांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. अजूनही समाजात भेदभावाच्या घटना घडत असताना, त्यांच्या समतेच्या संदेशाची आवश्यकता अधिक जाणवते. त्यांच्या शिकवणीप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला समान सन्मान देणे आणि मानवतेला सर्वोच्च स्थान देणे, हीच खरी भक्ती आहे.



संत चोखामेळा यांची पुण्यतिथी ही त्यांच्या कार्याचे स्मरण करण्याची आणि त्यांच्या विचारांना आपल्या जीवनात रुजवण्याची संधी आहे. त्यांच्या समतेच्या आणि भक्तीच्या मार्गावर चालणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# ना कश्मीर, ना हिमाचल! महाराष्ट्रातील 'या' गावात सफरचंदाची शेती, शेतकरी मालामाल

सक्सेस स्टोरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सफरचंद म्हटले, की डोळ्यांसमोर काश्मीर किंवा हिमाचल प्रदेशातील थंडी आणि बर्फाच्छादित डोंगर येतात. सफरचंदाचं पीक ही मोठ्या प्रमाणात याच भागात घेतले जाते. सफरचंदाची शेती महाराष्ट्रात करावी असा विचार ही कोणी करणार नाही. मात्र, महाराष्ट्राच्या मातीतही सफरचंद पिकू शकतात, हे वाई तालुक्यातील पसरणी घाटाच्या पायथ्याशी असलेल्या एका जिद्दी शेतकऱ्याने सिद्ध करून दाखवले आहे. बापू भिलारे असे या प्रयोगशील शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांच्या या सफरचंद बागेची सध्या राज्यभर चर्चा सुरू आहे. त्यांनी यशस्वीपणे इथं सफरचंदाची बाग फुलवली आहे.

भिलारे यांच्या या अजब प्रयोगाची दखल थेट प्रशासनाने घेतली आहे. पश्चिम महाराष्ट्र महसूल आयुक्त, सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील आणि कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नुकतीच भिलारे यांच्या शेतात जाऊन पाहणी केली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि वेगळ्या हवामानात सफरचंदाचे पीक घेतल्याबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी भिलारे यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. प्रत्येक शेतकऱ्यांने असे काही तरी करण्याची गरज आहे असं ही त्यांनी या निमित्ताने सांगितले.



महाबळेश्वर आणि पाचगणीला जाणाऱ्या पर्यटकांच्या वाटेतच ही बाग असल्याने, आता पर्यटकांची पावले या बागेकडे वळू लागली आहेत. स्थानिक शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांना फाटा देऊन अशा नगदी पिकांकडे वळावे, जेणेकरून आर्थिक सुबत्ता येईल, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. बापू भिलारे यांनी मोठ्या कष्टाने ही बाग उभारली आहे. त्यामुळे त्यांची भरभराट ही होणार आहे. त्यांच्या बागेतील सफरचंदाला आता पासूनच मोठी मागणी आहे. व्यापारी हे फळ खरेदी करण्याच्या तयारीत आहेत. ही बाग लावताना त्यांनी कश्मीरमधील शेतकऱ्यांचे मार्गदर्शन घेतले होते.

महाराष्ट्राचा 'मिनी काश्मीर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाबळेश्वरच्या पायथ्याशी वाईमध्ये आता प्रत्यक्ष सफरचंदाची लालचुटूक फळे लगडली आहेत. पसरणी घाट परिसरातील दक्षिणकाशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाईमध्ये बापू भिलारे या शेतकऱ्याने हा नवा इतिहास रचला आहे. भिलारे यांच्या कष्टाला फळ आले असून त्यांची बाग पाहण्यासाठी लोकांची झुंबड उडाली आहे. महसूल आयुक्त आणि जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन या फळांची चव चाखली आणि भिलारे यांचे अभिनंदन केले. "महाराष्ट्रात सफरचंद पिकवणे हे एक मोठे आव्हान होते, पण भिलारे यांनी ते लीलया पेलले आहे," अशा शब्दांत अधिकाऱ्यांनी गौरवोद्गार काढले.

हा प्रयोग केवळ एका शेतकऱ्यापुरता मर्यादित न राहता संपूर्ण सातारा जिल्ह्यासाठी एक दिशादर्शक ठरणार आहे. कमी जागेत आणि योग्य नियोजनाद्वारे सफरचंदाचे उत्पादन घेऊन लाखोंची कमाई करता येते, हे या प्रयोगातून समोर आले आहे. शेतीमध्ये सातत्याने नवनवीन प्रयोग करणाऱ्या सातारा जिल्ह्यातील या शेतकऱ्याने अशक्य वाटणारी गोष्ट शक्य करून दाखवली आहे. या बागेत आता फळे काढणीला आली असून पर्यटकांचा ओघ वाढला आहे. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनीही या बागेची तांत्रिक पाहणी करून हा प्रयोग इतर शेतकऱ्यांसाठी कसा फायदेशीर ठरेल, यावर चर्चा केली.

# सलमानची हिरोईन टिफिन सर्व्हिस चालवून करते उदरनिर्वाह

## १६ व्या वर्षी मिळाली प्रसिद्धी अन् आज जगतेय 'असे' आयुष्य

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



बॉलीवूडमध्ये झगमगाटामागे अनेकदा संघर्षाची मोठी काळी बाजू दडलेली असते. 'वीरगती' फेम पूजा डडवालची गोष्ट ही याच संघर्षाचे जीवंत उदाहरण आहे. अवघ्या १६ व्या वर्षी सलमान खानची नायिका बनून करिअरची सुरूवात करणाऱ्या पूजाने इंडस्ट्रीत नाव कमावले होते. मात्र, काळाच्या ओघात फुफ्फुसांचा आजार आणि 'टीबी'मुळे तिची प्रकृती खालावली. अशा कठीण प्रसंगी कुटुंबाने साथ सोडली असताना सलमान खानच्या 'बीइंग ह्युमन' फाऊंडेशनने तिला उपचारांसाठी मदत केली. मृत्यूच्या दाढेतून परतलेली पूजा आज पुन्हा एकदा स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी धडपडत असून सध्या ती टिफिन सर्व्हिस चालवून आपला उदरनिर्वाह करत आहे.

पूजा डडवालने १९९५ मध्ये आलेल्या 'वीरगती' या चित्रपटातून अवघ्या १६ व्या वर्षी अभिनयाला सुरूवात केली होती. एका वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत तेव्हाची आठवण सांगताना पूजाने सांगितले, की तिला पहिला मोठा ब्रेक मिळाल्यावर तिने अभिनयाचे क्लास सुरू केले होते. सलमान खानबरोबर काम करणे एका किशोरवयीन मुलीसाठी हे एखाद्या स्वप्नासारखे होते. "तो माझ्या आयुष्यातील सर्वात आनंदाचा काळ होता," असे ती म्हणाली. पण हे सगळे फार काळ टिकले नाही.

### गाजलेल्या मालिकांमध्ये पूजा डडवालने केले काम

चित्रपटसृष्टीत स्वतःचा सिद्ध करण्यापूर्वीच पूजा छोट्या पडद्याकडे वळली. तिने अनेक टीव्ही मालिकांत काम केले. २००१ मध्ये झी टीव्हीवरील 'घराना' ही तिची शेवटची मोठी मालिका होती. अमन वर्मा आणि सुचेता खन्ना यांसारख्या कलाकारांबरोबर काम करून तिला ओळख आणि नवीन संधीही मिळाल्या. तिला वाटले, की करिअर योग्य दिशेने जात आहे, पण नियतीच्या मनात वेगळेच होते.

या काळात तिची भेट राजेंद्र सिंहला भेटली. त्याने कठीण काळात तिला साथ दिली. करिअरमध्ये स्थिरावत असताना तिची प्रकृती बिघडू लागली. पण हे फक्त आजारपण नव्हते, तर तिच्या वैयक्तिक आयुष्यातील एक मोठे संकट होते. "लोक अनेक स्वप्ने पाहतात आणि अचानक फक्त आरोग्याच्या समस्यांमुळे त्यांना एखाद्या किड्यासारखे फेकून दिले जाते," असे ती बीबीसीशी बोलताना म्हणाली होती.

### गोव्यात नोकरी, प्रकती खालावली अन् फुफ्फुस निकामी झाले

पूजा डडवालला इंडस्ट्रीत काम मिळत नव्हते. त्यामुळे तिने गोव्यातील एका कॅसिनोमध्ये नोकरी सुरू केली होती. यादरम्यान तिची प्रकृती इतकी खालावली की तिचे दोन्ही फुफ्फुस निकामी झाले. तिला रक्ताच्या उलट्या होऊ लागल्या, भूक लागेनाशी झाली आणि दिवसेंदिवस ती अशक्त होत गेली. अशा कठीण काळात, जेव्हा तिला आधाराची सर्वात जास्त गरज होती, तेव्हा तिच्या कुटुंबाने तिला वाऱ्यावर सोडले. अशा वेळी राजेंद्र तिच्या मदतीला धावून आला. त्यांनी तिला मुंबईला नेले, तिच्यावर उपचार केले आणि तिला साथ दिली. तपासणीनंतर तिला 'टीबी' (क्षयरोग) झाल्याचे निदान झाले.

### सलमान खानने केलेली पूजा डडवालला मदत

२०१८ मध्ये पूजाचा एक हृदयद्रावक व्हिडिओ व्हायरल झाला. तिने तिचा जुना सहकलाकार सलमान खानला उद्देशून हा व्हिडिओ केला होता. यात तिने सलमानकडे पैसे नाही, तर फक्त उपचारांसाठी मदत मागितली होती. त्यानंतर सलमान खानच्या 'बीइंग ह्युमन' फाऊंडेशनने पुढाकार घेतला, तिच्या उपचारांचा सर्व खर्च उचलला आणि तिला बरे होण्यासाठी पूर्ण मदत केली होती. 'मुंबई मिरर'शी त्याबद्दल बोलताना पूजाने सांगितले होते, की हॉस्पिटलच्या वॉर्डमध्ये पडून असताना तिने जगण्याची आशा जवळपास सोडली होती. तिच्या आजूबाजूला असे रुग्ण एकाकी आणि हताश अवस्थेत मृत्यूमुखी पडताना ती पाहत होती. पण तिने लढायचे ठरवले आणि ती यातून बाहेर आली. तिच्याबद्दल समजल्यावर अनेकांनी तिला फोन केले. पण काम कुणीच दिले नाही. काहींनी तर चुकीच्या हेतूने तिला फोन केले, तिला हतबल समजून तिचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला. "मला पैसे नको आहेत, मला फक्त कामाची गरज आहे," असे तिने एका वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट केले होते.

### टिफिन सर्व्हिस चालवते पूजा डडवाल

आज पूजा डडवाल एका छोट्या १० बाय १० च्या खोलीत राहते आणि उदरनिर्वाह करण्यासाठी टिफिन सर्व्हिस चालवते. घरगुती जेवण बनवून ती पैसे कमावते. इतकी संकटे येऊनही तिचा स्वतःवरचा विश्वास डगमगलेला नाही. ती म्हणते, "मी कधीही चुकीचा रस्ता निवडला नाही आणि कधी निवडणारही नाही."

खरे तर ज्या पूजाने आपल्या कुटुंबासाठी स्वतःच्या करिअरमधून २० वर्षांचा मोठा ब्रेक घेतला होता, तिलाच तिची आर्थिक स्थिती खालावल्यावर त्याच कुटुंबाने वाऱ्यावर सोडले. "त्यांनी मला त्यांच्या आयुष्यातून दूर का केले, हे मला आजही माहित नाही," असे ती खिन्नपणे सांगते. "मी आता बरी आहे. मी फक्त याची वाट पाहत आहे, की कोणीतरी मला पुन्हा फोन करेल आणि अभिनयाची आणखी एक संधी देईल," असं पूजा डडवाल म्हणते. खरे पूजा डडवालची ही गोष्ट फक्त एका अभिनेत्रीच्या यशाची आणि अपयशाची नाही, तर या इंडस्ट्रीतील क्षणभंगुर लोकप्रियतेची आहे. असे अनेक कलाकार इंडस्ट्रीपासून दूर गेल्यावर हलाखीच्या परिस्थितीत जगत आहेत.

# पंतप्रधान मोदींनी ताफा थांबवून खाल्ली झालमुडी

## ती नक्की आहे तरी काय? पाहा घरच्या घरी बनवण्याची सोपी रेसिपी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांच्या रणधुमाळीत राजकीय घडामोडींसोबतच एका खास पदार्थाची जोरदार चर्चा रंगली आणि तो खास पदार्थ म्हणजे झालमुडी. रविवारी, दि. १९ एप्रिल रोजी बंगालमधील एका निवडणूक रॅलीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपला ताफा थांबवून रस्त्याच्या कडेला असलेल्या एका छोट्या स्टॉलवर झालमुडीचा आस्वाद घेतला होता. या घटनेनंतर झालमुडी हा पदार्थ घराघरात पोहोचला. हा अस्सल बंगाली पदार्थ जगभरात लोकप्रिय झाला असून अनेक जण त्याची रेसिपी शोधू लागले आहेत. आपण हा पदार्थ नक्की कसा बनवितात, याची रेसिपी पाहणार आहोत.

झालमुडी हा पश्चिम बंगालमधील सर्वात लोकप्रिय स्ट्रीट फूड प्रकार आहे. कुरमुरे, मोहरीचे तेल आणि खास मसाल्यांच्या मिश्रणातून झालमुडी तयार होते. ही चव एकदा जिभेवर रेंगाळली की ती विसरणे कठीण असते. जर तुम्हालाही या तिखट, आंबट आणि कुरकुरीत झालमुडीची चव घरच्या घरी घ्यायची असेल तर ही सोपी पद्धत जाणून घ्या.

### आवश्यक साहित्य

- कुरमुरे (ममरा)
- बारीक चिरलेला कांदा आणि टोमॅटो
- हिरवी मिरची आणि कोथिंबीर
- उकडलेला बटाटा
- भाजलेले हरभरे आणि शेंगदाणे
- बारीक शेव
- मोहरीचे तेल (अस्सल चवीसाठी)
- मीठ, लाल तिखट, चाट मसाला
- लिंबाचा रस

### कृती

– एका मोठ्या भांड्यात ताजे आणि कुरकुरीत कुरमुरे घ्या. त्यात बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो, हिरव्या मिरच्या आणि उकडलेल्या बटाट्याचे लहान तुकडे घाला. यानंतर त्यात भाजलेले शेंगदाणे, हरभरे आणि आवडीनुसार बारीक शेव टाका. यामुळे झालमुडी छान क्रिस्पी होते. यात चवीनुसार मीठ, तिखट आणि चाट मसाला घाला. आता सगळ्यात महत्त्वाचा घटक म्हणजे मोहरीचे तेल. एक-दोन चमचे कच्चे मोहरीचे तेल घातल्यामुळे या पदार्थाला खरी बंगाली ओळख मिळते. यानंतर शेवटी लिंबाचा रस आणि ताजी कोथिंबीर घालून सर्व साहित्य व्यवस्थित एकजीव करा.

### आरोग्यदायी आणि चविष्ट पर्याय

झालमुडी बनविल्यानंतर ती लगेच सर्व्ह करा. जास्त वेळ ठेवल्यास कुरमुरे मऊ पडतात आणि त्याची मूळ मजा निघून जाते. चहाच्या वेळेस किंवा हलकी भूक लागल्यावर खाण्यासाठी हा एक उत्तम आरोग्यदायी आणि चविष्ट पर्याय आहे.

# कापलेले कलिंगड किती वेळापर्यंत खाण्यायोग्य असते?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



कलिंगड उन्हाळ्यातील सर्वांत पसंद केले जाणारे फळ आहे. मात्र, कापल्यानंतर ते किती काळापर्यंत खाणे योग्य असते?
जर तुम्ही कापलेल्या कलिंगडाला रूम टेंपरेचरला ठेवले असेल, तर दोन तासांच्या आत खाणे योग्य ठरते. मात्र, जर तुम्ही कापलेले कलिंगड फ्रीजमध्ये ठेवले असेल, तर ते ३ ते ५ दिवस खाता येऊ शकते. परंतु जर तुम्ही कलिंगड कापून फ्रीजमध्ये स्टोअर करत आहात, तर एअर टाईट कंटेनरमध्ये ठेवूनच स्टोअर करा.
जर तुम्ही कलिंगड खात असताना आंबट किंवा विचित्र चव आणि आंबल्यासारखा वास येत असेल, चिकटपणा जाणवत असेल तर ते खराब झाल्याचे समजावे.

# कच्च्या कैरीत दडलाय पोषणाचा खजिना!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



### पोषणाचा मोठा खजिना

उन्हाळ्यात आवडीने खाल्ली जाणारी कच्ची कैरी फक्त चवदार नाही, तर शरीरासाठी पोषणाचा मोठा खजिनाही आहे.

### व्हिटॅमिन सी चा जबरदस्त स्रोत

कच्च्या कैरीत शरीराला आवश्यक असलेले व्हिटॅमिन सी असते. हे रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी आणि त्वचा निरोगी ठेवण्यासाठी महत्त्वाचे असते.

### डोळ्यांसाठी फायदेशीर व्हिटॅमिन ए

कच्च्या कैरीत व्हिटॅमिन ए चेही चांगले प्रमाण असते. हे डोळ्यांची दृष्टी सुधारण्यास आणि त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करते.

### शरीराला ऊर्जा देणारे फोलेट

कच्च्या कैरीत फोलेट म्हणजेच व्हिटॅमिन बी९ भरपूर असते. हे नवीन पेशी तयार होण्यासाठी आणि शरीरात ऊर्जा निर्माण करण्यासाठी उपयुक्त मानले जाते.

### हृदयासाठी पोर्टॅशियमचा फायदा

कच्च्या कैरीत पोर्टॅशियमही चांगल्या प्रमाणात असते. हे रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास आणि हृदय निरोगी ठेवण्यास मदत करते.

### पचन सुधारण्यासाठी फायबर

कच्च्या कैरीत जवळपास २.६ ग्रॅम फायबर असते. यामुळे पचन सुधारते आणि बद्धकोष्ठता, गॅस यांसारख्या समस्या कमी होण्यास मदत होते.

### वजन कमी करण्यासाठी उपयुक्त

कच्च्या कैरीत कमी कॅलरीज आणि जास्त फायबर असल्यामुळे ती वजन कमी करण्यासाठी फायदेशीर ठरू शकते.

### उष्माघाताचा धोका कमी

कच्च्या कैरीपासून बनविलेले पन्हें शरीराला थंडावा देते. हे शरीर हायड्रेट ठेवून उष्माघाताचा धोका कमी करण्यास मदत करते.

### लिव्हरसाठीही फायदेशीर

तज्ज्ञांच्या मत, कच्ची कैरी लिव्हर डिटॉक्स करण्यात मदत करू शकते. तसेच शरीरातील पित्त संतुलित ठेवण्यासही ती उपयोगी मानली जाते.

### कच्ची कैरी कशी खावी?

कच्ची कैरी पन्हे, चटणी, कोशिंबीर किंवा मसाला लावून खाऊ शकता. मात्र अति सेवन टाळा आणि संतुलित प्रमाणातच आहारात समाविष्ट करा.

# सबसे ज्यादा शून्य पर आउट होने वाले भारतीय क्रिकेटर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आइए जानते हैं कि अंतरराष्ट्रीय क्रिकेट में सबसे ज्यादा बार शून्य पर आउट होने वाले भारतीय खिलाड़ी कौन–कौन हैं। आज इस सूची पर नजर डालते हैं ।

### १) जहीर खान

भारत के लिए सबसे ज्यादा बार डक पर आउट होने वाले खिलाड़ी पूर्व तेज गेंदबाज जहीर खान हैं। उन्होंने अपने करियर में ३०३ मैचों में ४३ बार शून्य पर पवेलियन लौटे।

### २) ईशांत शर्मा

सूची में दूसरे स्थान पर ईशांत शर्मा हैं, जिन्होंने १९९ मैचों में ४० बार शून्य पर आउट हुए।

### ३) विराट कोहली

तीसरे स्थान पर विराट कोहली हैं, जिन्होंने अब तक ५५१ मैचों में ३९ बार शून्य पर आउट हुए हैं।

### ४) हरभजन सिंग

पूर्व स्पिन गेंदबाज हरभजन सिंग अंतरराष्ट्रीय क्रिकेट में कुल ३७ बार शून्य पर आउट हुए।

### ५) जसप्रीत बुमराह

सूची में जसप्रीत बुमराह का नाम भी शामिल है, जिन्होंने अब तक अंतरराष्ट्रीय क्रिकेट में कुल ३५ बार शून्य पर आउट हुए हैं।

### ६) अनिल कुंबले

पूर्व स्पिन गेंदबाज अनिल कुंबले अंतरराष्ट्रीय क्रिकेट में ३५ बार खाता नहीं खोल सके।

### ७) रोहित शर्मा और सचिन तेंदुलकर

रोहित शर्मा अंतरराष्ट्रीय क्रिकेट में ३४ बार शून्य पर आउट हुए हैं, जबकि सचिन तेंदुलकर भी ३४ बार अंतरराष्ट्रीय क्रिकेट में खाता नहीं खोल सके।

शांत – चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# भगवान हनुमान जी के प्रमुख सिद्ध पीठ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**भगवान हनुमान जी के प्रमुख सिद्ध पीठ**

**मेहंदीपुर बालाजी (राजस्थान) :** दौसा जिले में स्थित यह मंदिर दुष्ट आत्माओं और संकटों के निवारण के लिए विश्व प्रसिद्ध है।

**सालासर बालाजी (राजस्थान) :** चूरू जिले में स्थित, यहाँ हनुमान जी दाढ़ी-मूंछ वाले रूप में विराजमान हैं।

**हनुमानजी की गढ़ी (अयोध्या, उत्तर प्रदेश) :** अयोध्या में स्थित, यहाँ हनुमान जी बाल रूप में माता अंजनी की गोद में विराजमान हैं।

**संकटमोचन हनुमानजी का मंदिर (वाराणसी, उत्तर प्रदेश) :** इसकी स्थापना स्वयं गोस्वामी तुलसीदास जी ने की थी।

**अंजनाद्रि पर्वत (हम्पी, कर्नाटक) :** इसे हनुमान जी का जन्मस्थान माना जाता है।

**लेटे हुए हनुमान जी (प्रयागराज, उत्तर प्रदेश) :** संगम तट पर स्थित, यह हनुमान जी की अनूठी लेटी हुई प्रतिमा है।

# परशुराम : भगवान श्रीविष्णूंचा सहावा अवतार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

परशुराम भगवान श्रीविष्णूंचा ६ वा अवतार आहे. त्याच्या कथा रामायणात, महाभारतात व काही पुराणांत आढळतात. त्याच्या आधीच्या अवतारांसारखे त्याच्या नावाचे स्वतंत्र पुराण नाही.

## आई-वडील

परशुरामाची आई रेणुका व वडील भृगुकुलोत्पन्न ऋषी जमदग्नी हे होत. एकोणिसाव्या त्रेतायुगात (महाभारतानुसार त्रेता व द्वापार युगांच्या संधीकालात) परशुरामाचा जन्म झाला.

## कार्य

अधम अशा क्षत्रियांचा वध : 'वाल्मीकीने त्याला 'क्षत्रविमर्दन' न म्हणता 'राजविमर्दन' म्हटले आहे. यावरून असे म्हणता येते की, परशुरामाने सरसकट क्षत्रियांचा संहार न करता, दुष्ट-दुर्जन अशा क्षत्रीय राजांचा संहार केला.' कार्तवीर्याने जमदग्नीऋषींच्या आश्रमातून कामधेनू व तिचे वासरू पळवून नेले. त्या वेळी परशुराम तिथे नव्हता. परत आल्यावर त्याला हे कळताच त्याने कार्तवीर्याच्या वधाची प्रतिज्ञा केली. नर्मदेच्या तीरी त्या दोघांत द्वंद्वयुद्ध झाले. त्यात परशुरामाने त्याला ठार मारले. यानंतर आपले पिता जमदग्नी यांच्या आज्ञेप्रमाणे तो तीर्थयात्रा व तपश्चर्या करण्यासाठी गेला. परशुराम गेल्यावर कार्तवीर्याच्या वधाचा सूड घेण्यासाठी हैहयांनी जमदग्नीऋषींचे शिर धडावेगळे करून त्यांची हत्या केली. हा वृत्तान्त समजल्यावर परशुराम लगेच आश्रमात पोहोचला. जमदग्नींच्या शरिरावरील एकवीस जखमा पाहून त्याने तत्क्षणी प्रतिज्ञा केली, की हैहय व इतर क्षत्रियाधमांनी केलेल्या या ब्रह्महत्येबद्दल शिक्षा म्हणून एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रीय करीन. या प्रतिज्ञेप्रमाणे त्याने उन्मत्त झालेल्या क्षत्रियांचा नाश करावा, युद्ध संपल्यावर महेंद्र पर्वतावर जावे, क्षत्रीय माजले की, पुन्हा त्यांचा नाश करावा, अशा एकवीस मोहिमा केल्या. समंतपंचकावर शेवटचे युद्ध करून त्याने आपला रक्ताने माखलेला परशू धुतला व शस्त्र खाली ठेवले.

क्षेत्रपालदेवतांची स्थाने प्रस्थापित करणे : परशुरामाने २१ वेळा पृथ्वी-प्रदक्षिणा करतांना १०८ शक्तीपीठांची, तीर्थक्षेत्रांची, म्हणजेच क्षेत्रपालदेवतांची स्थाने प्रस्थापित केली.



## वैशिष्ट्ये

**अग्रतः चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।**
**इदं ब्राह्मं इदं क्षात्रं शापादपि शरादपि ॥**

**अर्थ :** चार वेद मुखोद्गत आहेत म्हणजे पूर्ण ज्ञान आहे व पाठीवर बाणांसह धनुष्य आहे, म्हणजे शौर्य आहे; म्हणजेच येथे ब्राह्मतेज व क्षात्रतेज अशी दोन्ही तेजे आहेत. जो कोणी विरोध करील, त्यास शाप देऊन अथवा बाणाने परशुराम हरवील.

तेज रामात संक्रमित करणे : एकदा (दशरथपुत्र) रामाची कीर्ती ऐकून त्याच्या पराक्रमाची परीक्षा पहाण्यासाठी परशुराम त्याच्या वाटेत आडवा आला व आपले धनुष्य रामाच्या हातात देऊन ते वाकवून त्याला बाण लावून दाखवण्यास सांगितले. रामाने तसे केले व हा बाण मी कशावर सोडू म्हणून विचारले. 'माझी या (काश्यपी)भूमीवरची गती निरुद्ध कर', असे परशुरामाने सांगितल्यावर रामाने तसे केले. या प्रसंगी परशुरामाने स्वतःचे धनुष्य रामाला देऊन टाकले. अशा प्रकारे परशुरामाने धनुष्य देऊन आपले क्षात्रतेज रामात संक्रमित केले.

धनुर्विद्येचा सर्वोत्तम शिक्षक : एकदा शस्त्र खाली ठेवल्यानंतर परशुरामाने क्षत्रियांशी वैरभाव सोडून दिला व ब्राह्मण, क्षत्रिय या सर्वांना समभावाने अस्त्रविद्या शिकवायला सुरुवात केली. महाभारतातील भीष्माचार्य, द्रोणाचार्य इत्यादी थोर योद्धे परशुरामाचेच शिष्य होते.

दानशूर : परशुरामाने ज्या क्षत्रीयवधासाठी मोहिमा केल्या, त्यामुळे संपूर्ण पृथ्वीवर त्याचे स्वामित्व आले. त्यामुळे त्याला अश्वमेध यज्ञाचा अधिकार प्राप्त झाला व त्याने अश्वमेध यज्ञ केला. यज्ञाच्या शेवटी या यज्ञाचा अध्वर्यु कश्यप याला परशुरामाने सर्व भूमी दान केली.

भूमीची नवनिर्मिती : जोपर्यंत परशुराम या भूमीत आहे, तोपर्यंत क्षत्रीय कुळांचा उत्कर्ष होणार नाही, हे जाणून कश्यपाने परशुरामाला सांगितले, 'आता या भूमीवर माझा अधिकार आहे. तुला इथे रहाण्याचाही अधिकार नाही.' यानंतर परशुरामाने समुद्र हटवून स्वतःचे क्षेत्र निर्माण केले. वैतरणा ते कन्याकुमारीपर्यंत असलेल्या या भूभागाला 'परशुरामक्षेत्र' ही संज्ञा आहे. परशुराम हा सप्तचिरंजीवांपैकी एक आहे.

## परशुराम क्षेत्रे

सह्याद्रीच्या उत्तर टोकावर साल्हेरच्या डोंगरावरील मध्ययुगीन गडावर, पंजाबात कांगडा जिल्ह्यामध्ये, कोकणात चिपळूणपासून पाच मैलांवरील एका डोंगरावर तसेच गोमंतकात काणकोण येथे परशुरामाचे एक पुरातन मंदिर आहे.

## मूर्ती

भीमकाय देह, मस्तकी जटाभार, खांद्यावर धनुष्य व हातात परशू अशी परशुरामाची मूर्ती असते.

## पूजा विधी


परशुराम हा भगवान श्रीविष्णूंचा अवतार असल्याने तो उपास्यदेवता म्हणून पुजला जातो. वैशाख शुद्ध तृतीयेला येणारी परशुराम जयंती एक कात व उत्सव म्हणून साजरी केली जाते.

# कसा झाला नारदमुनींचा जन्म?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पौराणिक मान्यतेनुसार धार्मिक ग्रंथांमध्ये असे वर्णन केले आहे, की मागील कल्पात, नारद 'उपबर्हण' नावाचा एक गंधर्व होता. एकदा भगवान ब्रह्मदेवाने उपबर्हणला त्याच्या असभ्य वर्तनामुळे शूद्र म्हणून जन्म घेण्याचा शाप दिला. शापामुळे तो 'शूद्रादासी'चा मुलगा झाला. बालपणापासूनच ऋषी-मुनींच्या सहवासात राहिल्यामुळे रजोगुण आणि तमोगुणाचा नाश करणारी भक्ती या मुलाच्या मनात उदयास आली. भगवान नारायणाची सतत पूजा करत असताना एके दिवशी त्यांना प्रभूचे दर्शन झाले. या मुलाने नारायणाचे ते रूप आपल्या हृदयात जपले आणि त्याला पुन्हा-पुन्हा पाहण्याचा प्रयत्न केला. पण तो त्याला पुन्हा पाहू शकला नाही.

अचानक त्याला एका अदृश्य शक्तीचा आवाज ऐकू आला - अरे दासीच्या मुला! आता तू मला या जन्मात पुन्हा पाहणार नाहीस, पण पुढच्या जन्मात तू माझा सल्लागार होशील. एक हजार चतुर्युगी गेल्यानंतर, ब्रह्मा जागे झाले आणि जग निर्माण करण्याची इच्छा करू लागले. मग त्याच्या इंद्रियांमधून, नारद मारिचीसारख्या ऋषींसह मानसपुत्र म्हणून जन्माला आले आणि त्यांना ब्रह्माचे मानसपुत्र म्हटले गेले. तेव्हापासून श्री नारायणांच्या आशीर्वादामुळे, नारद ऋषी वैकुंठासह तिन्ही लोकात कोणत्याही अडथळ्याशिवाय फिरू लागले. नारद ऋषींना अमर मानले जाते. असे मानले जाते की ब्रह्ममुहूर्ताच्या वेळी ते वीणा वाजवत आणि देवाच्या पराक्रमांचे गाणे गात असताना सर्व प्राण्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवतात. त्याचवेळी रामायणातील एका घटनेनुसार, असे म्हटले जाते की नारद ऋषींच्या शापामुळे, त्रेता युगात भगवान रामांना माता सीतेपासून वियोग सहन करावा लागला. कामदेवही भगवान



नारायणांवरील त्यांची भक्ती आणि ब्रह्मचर्य तोडू शकत नव्हते, याचा नारद ऋषींना अभिमान होता. मग त्यांचा अहंकार दूर करण्यासाठी, भगवान विष्णूंनी आपल्या मायेने एक सुंदर शहर निर्माण केले, जिथे राजकुमारीचा स्वयंवर आयोजित केला जात होता. मग नारद ऋषीही तिथे पोहोचले आणि राजकुमारीला पाहून ते तिच्यावर मोहित झाले. त्या राजकुमारीशी लग्न करण्याची इच्छा बाळगून, त्यांनी भगवान विष्णूंकडे तिच्यासारखे सुंदर रूप मागितले.

### भक्ताची हाक देवापर्यंत पोहोचवितात देवर्षी नारद

नारदांनी भगवान विष्णूंपासून सुंदर रूप धारण केले आणि राजकुमारीच्या स्वयंवरात पोहोचले. तेथे पोहोचताच त्यांचा चेहरा माकडासारखा झाला. त्यांना अशा रूपात पाहून राजकन्येला नारदऋषींवर खूप राग आला आणि मग भगवान विष्णू राजाच्या रूपात आले आणि राजकन्येला घेऊन गेले. यामुळे संतप्त होऊन नारदजी भगवान विष्णूंकडे गेले आणि त्यांना शाप दिला की ज्याप्रमाणे आज मी एका स्त्रीसाठी तळमळत आहे, त्याचप्रमाणे मानव म्हणून जन्म घेतल्यानंतर तुम्हालाही एका स्त्रीपासून वियोग सहन करावा लागेल. तथापि मायेचा प्रभाव दूर झाल्यावर नारदांना खूप दुःख झाले, म्हणून त्यांनी भगवंतांची क्षमा मागितली, परंतु नंतर भगवान विष्णूने त्यांना समजावून सांगितले की हे सर्व मायेचा प्रभाव आहे. ती आपली चूक नाही.

### नारद जयंती; पूजा विधी आणि जन्म कथा

दरवर्षी वैशाख महिन्यातील कृष्ण पक्ष प्रतिपदा तिथीला नारद जयंतीचा उत्सव साजरा केला जातो. असे मानले जाते की या दिवशी नारद ऋषींचा जन्म झाला होता. नारदजींना पहिले पत्रकार देखील मानले जाते कारण ते तिन्ही जगात माहिती प्रसारित करण्याचे काम करायचे. नारद ऋषींना ब्रह्मदेवाचे पुत्र मानले जाते. या वर्षी २०२६ मध्ये शनिवार, २ मे रोजी नारद जयंती साजरी केली गेली. या दिवशी नारदजींची पूजा केल्याने जीवनात सुख आणि समृद्धी येते.

### पूजा विधी

नारद जयंतीच्या दिवशी सकाळी लवकर उठा, स्नान करा आणि स्वच्छ कपडे घाला. नंतर घरातील मंदिर स्वच्छ करा आणि गंगाजल शिंपडा. यानंतर तुमच्या आवडत्या देवतेचे ध्यान करा. आता एका चौरंगावर कापड पसरा आणि नारदजींची मूर्ती स्थापित करा. यानंतर दिवा आणि अगरबत्ती लावा आणि पूर्ण विधी आणि रीतीप्रमाणे नारदजींची पूजा करा.

# शून्यातून विश्व निर्माणाची आंतरिक शक्ती जिद्द

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

माणसाचे नशीब जन्मावेळी लिहिले जाते, असे म्हणतात. पण खरेतर ज्यांच्या नशिबात सुखाची आयती सावली नसते त्यांनाच कष्टाचे खरे मूल्य आणि अस्तित्वाची लढाई कळते. जेव्हा पाठीशी कुणाचा भक्कम आधार नसतो आणि आभाळही फाटलेले असते, तेव्हाच माणसाच्या रक्तात जिद्द नावाचं रसायन सळसळू लागते. ही जिद्द म्हणजे केवळ मेहनत नव्हे, तर शून्यातून विश्व निर्माण करण्याची आंतरिक शक्ती आहे.

आयुष्यात प्रत्येकाचा प्रवास सारखा नसतो. काहींना यश वारसाहक्काने मिळते, तर काहींना एका साध्या संधीसाठीही रक्ताचे पाणी करावे लागते. ज्यांच्याकडे गमावण्यासाठी काहीच नसते, त्यांच्याकडे मिळविण्यासाठी मात्र संपूर्ण जग असते.

कष्ट तर सगळेच करतात. पण त्याला जेव्हा जिद्दीची जोड मिळते, तेव्हा इतिहास घडतो. सुखाच्या सावलीत माणूस कदाचित आळसावेल. पण संकटाच्या उन्हात रापणारा माणूस कधीच थांबत नाही. ज्यांनी गरिबी, उपेक्षा आणि अपयश सोसले आहे. त्यांची इच्छाशक्ती पोलादी बनते. त्यांच्यासाठी कष्ट हा केवळ पर्याय नसून ते जगण्याचे अधिष्ठान बनते. हिऱ्याला पैलू पडल्याशिवाय जशी चकाकी येत नाही, तसेच संघर्षाच्या भट्टीतून तावून सुलाखून निघाल्याशिवाय यशाला झळाळी मिळत नाही. अशा लोकांचे यश हे केवळ नशिबाचा भाग नसून, त्यांच्या कतृत्वाने नशिबाच्या रेषा पुसून स्वतःच्या हाताने लिहिल्याचा तो जीवंत पुरावा असतो.

# रामरक्षा मराठी अर्थासह!

**संनद्धः कवची खी चापबाणधरो युवा ।**
**गच्छन् मनोरथोऽस्माकं रामः पातु सलक्ष्मणः ॥ २१ ॥**

संनद्धः निरंतर सज्ज, कवची चिलखत घातलेला,

**अर्थ :** चिलखत घातलेल्या व धनुष्य, बाण व तलवार यांनी निरंतर सज्ज असलेल्या तरूण श्रीरामामुळे आमचे मनोरथ सिद्धीस जावोत आणी लक्ष्मणासह श्रीराम आमचे रक्षण करोत.

**रामो दाशरथिः शूरो लक्ष्मणानुचरो बली ।**
**काकुत्स्थः पुरुषः पूर्णः कौसल्येयो रघूत्तमः ॥ २२ ॥**

काकुत्स्थः ककुत्स्थ हे श्रीरामांच्या कुळाच्या मूळ पुरुषाचे नाव. त्याच्या कुळात जन्म झाला म्हणून श्रीराम काकुत्स्थ.

**अर्थ :** दशरथपुत्र श्रीराम शूर आहे, लक्ष्मणासारखा बलवान मनुष्यही ज्याच्या पावलावर पाऊल ठेऊन चालतो असा (महान) आहे. ककुत्स्थ कुळातला हा पूर्ण पुरुष असलेला कौसल्येचा पुत्र रघुकुळात श्रेष्ठ आहे.

**वेदान्तवेद्यो यज्ञेशः पुराणपुरुषोत्तमः ।**
**जानकीवल्लभः श्रीमानप्रमेयपराक्रमः ॥ २३ ॥**

**अर्थ :** वेदान्तवेद्यो वेदांत हे ज्याला जाणून घ्यायचे साधन आहे असा,
पुराणपुरुषोत्तमः सनातन पुरुष,
जानकीवल्लभः सीतेचा पति,
श्रीमानप्रमेयपराक्रमः श्रीमान् + अप्रमेय + पराक्रमः, अप्रमेय ज्याच्या पराक्रमाची मोजदाद करता येत नाही असा (पराक्रमीइत्येतानि जपेन्नित्यं मद्भक्तः श्रद्धयान्वितः ।)

**अश्वमेधाधिकं पुण्यं सम्प्राप्नोति न संशयः ॥ २४ ॥**

**अर्थ :** या स्तोत्राचा जप जे माझे भक्त श्रद्धायुक्त मनाने करतील त्यांना अश्वमेध यज्ञापेक्षाही जास्त पुण्य प्राप्त होईल यात शंका नाही.

**रामंदूर्वादलश्यामं पद्माक्षं पीतवाससम् ।**
**स्तुवन्ति नामभिर्दिव्यैर्न ते संसारिणो नरः ॥ २५ ॥**

**अर्थ :** दूर्वादलासारखे सावळ्या वर्णाच्या, कमळासारखे डोळे असलेल्या, पिवळे वस्त्र परिधान केलेल्या (अशा) श्रीरामांचे दिव्य नाव घेऊन जे स्तुति करतात ते पुरुष संसाराच्या/ जन्ममरणाच्या जाळ्यातून मुक्त होतात.

**रामं लक्ष्मणपूर्वजम् रघुवरं सीतापतिं सुन्दरम् ।**
**काकुत्स्थं करुणार्णवं गुणनिधिं विप्रप्रियं धार्मिकम् ॥ २६ ॥**
**राजेन्द्रं सत्यसन्धं दशरथतनयं श्यामलं शान्तमूर्तिम् ।**
**वन्दे लोकाभिरामं रघुकुलतिलकम् राघवं रावणारिम् ॥ २७ ॥**

२६ व २७ श्लोकांचा एकत्र अर्थ -श्रीराम लक्ष्मणाग्रज, रघुकुळातले श्रेष्ठ, सीतेचे पती, व सुंदर आहेत. तसेच ककुत्स्थ कुळातले, करूणेचे सागर, गुणांचा खजिना, ब्राह्मणांना प्रिय असलेले व धार्मिक आहेत. राजांमध्ये श्रेष्ठ, सत्याशी कायम जोडलेले, दशरथपुत्र, सावळे व शांततेची मूर्ती आहेत. लोकांना प्रिय असणाऱ्या, रघुकुळात तिलकाप्रमाणे शोभणाऱ्या, रावणाच्या शत्रू आहेत. अशा (गुणांनी युक्त) श्रीरामांना मी वंदन करतो.

**रामाय रामभद्राय रामचन्द्राय वेधसे ।**
**रघुनाथाय नाथाय सीतायाः पतये नमः ॥ २८ ॥**

वेधसे प्रजापतिला

**अर्थ :** मी श्रीरामांना, श्रीरामभद्रांना, श्रीरामचंद्रांना, प्रजापतींना, रघुनाथांना, नाथांना, माता सीतेच्या पतींना वंदन करतो.

**श्रीराम राम रघुनन्दन राम राम ।**
**श्रीराम राम भरताग्रज राम राम ॥**
**श्रीराम राम रणकर्कश राम राम ।**
**श्रीराम राम शरणं भव राम राम ॥ २९ ॥**

**अर्थ :** श्रीराम हे रघुकुळातले श्रेष्ठ आहेत, भरताचे थोरले बंधु आहेत, रणांगणावर शूरवीर आहेत. अशा श्रीरामांना मी शरण आहे.

**श्रीरामचन्द्रचरणौ मनसा स्मरामि ।**
**श्रीरामचन्द्रचरणौ वचसा गृणामि ॥**
**श्रीरामचन्द्रचरणौ शिरसा नमामि ।**
**श्रीरामचन्द्रचरणौ शरणं प्रपद्ये ॥ 30 ॥**

**अर्थ :** मी श्रीरामांच्या चरणांचे मनाने स्मरण करतो, वाणीने गुणवर्णन करतो, शिरसाष्टांग नमस्कार करतो व शरण जातो.

**माता रामो मत्पिता रामचन्द्रः ।**
**स्वामी रामो मत्सखा रामचन्द्रः ॥**
**सर्वस्वं मे रामचन्द्रो दयालुः ।**
**नान्यं जाने नैव जाने न जाने ॥ 31॥**

**अर्थ :** श्रीराम माझी माता आहेत, पिता आहेत, स्वामी आहेत, मित्र आहेत. दयाळू असे श्रीराम माझे सर्वस्व आहेत. मी त्यांच्याशिवाय अन्य कोणालाही जाणत नाही.



**दक्षिणे लक्ष्मणो यस्य वामे तु जनकात्मजा ।**
**पुरतो मारुतिर्यस्य तं वन्दे रघुनन्दनम् ॥ ३२ ॥**

**अर्थ :** ज्याच्या उजव्या बाजूस लक्ष्मण आहे तसेच डाव्या बाजूस सीता आहे पुढे मारुती आहे अशा श्रीरामांना मी वंदन करतो.

**लोकाभिरामं रणरङ्गधीरं राजीवनेत्रं रघुवंशनाथम्।**
**कारुण्यरूपं करुणाकरं तं श्रीरामचन्द्रं शरणं प्रपद्ये ॥ ३३ ॥**

**अर्थ :** लोकांना प्रिय असलेल्या, रणांगणावर धीरगंभीर असलेल्या, कमळाप्रमाने नेत्र असलेल्या, रघुवंशात श्रेष्ठ असलेल्या, कारुण्याची मूर्ती असलेल्या, दया करणाऱ्या अशा श्रीरामांना मी वंदन करतो.

**मनोजवं मारुततुल्यवेगं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।**
**वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥ ३४ ॥**

**अर्थ :** मनाप्रमाणे, वाऱ्यासारखा वेग असलेल्या, जितेंद्रिय, बुद्धिमान लोकांमध्ये श्रेष्ठ, पवनपुत्र, वानरांच्या सेनेचा मुख्य असलेल्या (हनुमानजींना) मी शरण आहे.

**कूजन्तं रामरामेति मधुरं मधुराक्षरम् ।**
**आरुह्य कविताशाखां वन्दे वाल्मीकिकोकिलम् ॥ ३५ ॥**

**अर्थ :** कवितेच्या शाखेवर बसून वाल्मिकीरूपी कोकिळ श्रीराम श्रीराम अशा मधुर अक्षरांचे कूजन करत आहे, त्या वाल्मिकीरूपी कोकिळाला मी वंदन करतो.

**आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदाम् ।**
**लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ॥ ३६ ॥**

आपदामपहर्तारं आपदाम् + अपहर्तारं दुःखसंकटांचा नाश करणाऱ्या, भूयो भूयो पुनः पुनः

**अर्थ :** दुःखसंकटांचा नाश करणाऱ्या, सुखसमृद्धी देणाऱ्या, लोकांना प्रिय असणाऱ्या श्रीरामांना मी पुनः पुनः नमन करतो.

**भर्जनं भवबीजानामर्जनं सुखसंपदाम् ।**
**तर्जनं यमदूतानां रामरामेति गर्जनम् ॥ ३७ ॥**

**अर्थ :** संसारवृक्षाची बीजे जाळून टाकण्यासाठी, सुखसमृद्धी मिळवण्यासाठी, यमदूतांना घाबरवण्यासाठी राम राम अशी गर्जना (जप) करावा.

**रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे ।**
**रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नमः ॥ ३८ ॥**

**अर्थ :** (या आणि पुढच्या श्लोकात श्रीराम शब्दाच्या सातही विभक्ती वापरलेल्या आहेत). राजांमध्ये श्रेष्ठ श्रीरामांचा सदा विजय होतो. मी श्रीरामांना, रमेशांना म्हणजेच रमेच्या पतींना- भगवान विष्णूंना भजतो. श्रीरामांनी राक्षसांचे समुदाय नष्ट केले. त्या श्रीरामांना वंदन असो.

**रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोऽस्म्यहम् ।**
**रामे चित्तलयः सदा भवतु मे भो राम मामुद्धर ॥ ३९ ॥**

**अर्थ :** श्रीरामांपेक्षा अधिक कुशल कोणी नाही. मी श्रीरामांचा दास आहे. श्रीरामांमध्ये माझा चित्तवृत्तीचा लय होवो आणि हे श्रीराम माझा उद्धार कर.

**रामरामेति रामेति रमे रामे मनोरमे ।**
**सहस्त्रनामतत्तुल्यं रामनाम वरानने ॥ ४० ॥**

वरानने सुवदने,

**अर्थ :** (शंकर पार्वतीला सांगतात) हे सुमुखी, मनाला आनंद देणाऱ्या श्रीरामांच्या ठिकाणी मी रममाण होतो. रामाचे एक नाव (विष्णूच्या) हजार नावांच्या बरोबरीचे आहे.

**इति श्रीबुधकौशिकविरचितं श्रीरामरक्षास्त्रोत्रं सम्पूर्णम् ।**

**अर्थ :** श्रीबुधकौशिकऋषींनी रचलेले श्रीरामरक्षा नावाचे स्तोत्र येथे संपले.

**॥ श्रीसीतारामचन्द्रार्पणमस्तु ॥**

**अर्थ :** हे स्तोत्र श्रीराम व सीतेला अर्पण असो.

**॥ शुभं भवतु ॥**

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**